# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

# २०१५

## (पेपर क्र. ३)

**विषय - बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग - 2**
**माध्यम : मराठी**

१. क्षेत्रनिहाय व घटकनिहाय महत्त्वांश

२. प्रश्नपत्रिका आराखडा

३. उत्तरसूची

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

## घटकनिहाय महत्त्वांश

## विषय : बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग - 2

**माध्यम - मराठी** **एकूण गुण : 100**

**विभाग : I** **विषय : बुद्धिमत्ता चाचणी** **(गुण : 70)**

| क्र. | घटक | उपघटक | कमाल प्रश्न | किमान प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | आकलन | सूचनापालन<br>संख्यामालिका<br>इंग्रजी अक्षरमाला | 1<br>1<br>1 | 3 |
| 2. | वर्गीकरण | शब्दसंग्रह<br>आकृत्या<br>संख्या | 1<br>1<br>1 | 3 |
| 3. | क्रम | संख्यामालिका<br>आकृत्यांची मालिका<br>चिन्हमालिका<br>चुकीचे पद ओळखणे | 1<br>1<br>1<br>1 | 4 |
| 4. | तर्क व अनुमान | भाषिक<br>अभाषिक | 2<br>2 | 4 |
| 5. | जलप्रतिबिंब | अंक/अक्षरे/आकृत्या | 2 | 2 |
| 6. | आरशातील प्रतिमा | अंक/अक्षरे/आकृत्या | 2 | 2 |
| 7. | सम संबंध | शब्दसंग्रह<br>आकृत्या<br>संख्या | 1<br>1<br>1 | 3 |
| 8. | समान पद ओळखणे | आकृत्या | 1 | 1 |
| 9. | कूट प्रश्न | रांगेतील स्थान<br>दिशा<br>दिनदर्शिका<br>वेन आकृती<br>चौरसातील संख्या | 1<br>1<br>1<br>2<br>1 | 5 |
| 10. | गटाशी जुळणारे पद | शब्दसंग्रह<br>आकृत्या<br>संख्या | 1<br>1<br>1 | 3 |
| 11. | सांकेतिक भाषा | अंकांचा वापर<br>अक्षरांचा/चिन्हांचा वापर | 2<br>2 | 3 |
| 12. | विशेष प्रश्न | भावनिक बुद्धिमत्ता<br>सामाजिक बुद्धिमत्ता | 1<br>1 | 2 |
| | | एकूण प्रश्न | | 35 |

# विभाग : II

## विषय - परिसर अभ्यास भाग २

(गुण -30)

| अ.क्र. | घटक | उपघटक | कमाल प्रश्न | किमान प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | मध्ययुगीन समाजजीवन | समाजाची दुरावस्था, अस्थिरता व अधोगती राजेशाही काही चांगले राज्यकर्ते | 1 | 1 |
| 2. | शिवपूर्वकाल | शिवजन्मापुर्वीचा महाराष्ट्र<br>संतांची शिकवण<br>मराठी सरदारांची कामगिरी | 1<br>1<br>1 | 1 |
| 3. | शिवरायांचे बालपण | शिक्षण<br>स्वराज्याची स्थापना | 1<br>1 | 2 |
| 4. | स्वराज्याची वाटचाल | स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त<br>आदिलशाहीशी संघर्ष<br>(पन्हाळगडाचा वेढा व पन्हाळगडावरील पराक्रम)<br>मुघलांशी संघर्ष | 2<br><br>3<br>3 | 6 |
| 5. | शिवराज्याभिषेक व त्यानंतरची वाटचाल | राज्याभिषेक<br>दक्षिण दिग्विजय<br>छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू | 1<br>1<br>1 | 2 |
| 6. | शिवछत्रपतींची थोरवी | लोकहितकारी व कार्यक्षम राज्यव्यवस्था<br>लष्करी नीती व लष्करी कामगिरी<br>धर्म सहिष्णुता | 1<br>1<br>1 | 2 |
| 7. | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा | मध्ययुगाकडून आधुनिक युगाकडे वाटचाल व त्या वाटचालीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव<br>स्वातंत्र्याचे व लोककल्याणाचे महत्त्व | 1<br><br>1 | 1 |
| | | एकूण | | 15 |

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)
## नमुना प्रश्नपत्रिका
## विषय - बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग - २

**प्रश्नपत्रिका क्र. III** **माध्यम : मराठी** **एकूण गुण - 100**

---

**विभाग : I** **बुद्धिमत्ता चाचणी** **(गुण - 70)**

| अक्षरमाला : ABCDE FGHIJ KLMNO PQRST UVWXY |
|---|

**1.** खालील अक्षरे प्रत्येकी एकदा वापरुन अर्थपूर्ण शब्द तयार करा.
क्ष,ता,सा,र
(1) साक्षरता (2) तारसाक्ष (3) रक्षतासा (4) सारताक्ष

**2.** संख्यामालिका - ३ १ २ २ १ २ १ २ १ २ १ २ १ २ १ ३ २ १ ३ १ २ ३
वरील संख्यामालिकेत १ नंतर लगेच २ हा अंक आहे असे किती वेळा झाले आहे ?
(1) ८ (2) ६ (3) ५ (4) ७

**3.** जर A = १ G = ७ असेल तर T या अक्षरासाठी कोणती संख्या येईल ?
(1) ४ (2) १० (3) १६ (4) २०

**प्र 4 ते 6 : सूचना - गटात न बसणारे पद ओळखा.**

**4.** (1) संगीत (2) तबला (3) संवादिनी (4) वीणा

**5.** (1) ४५ (2) ३५ (3) २२५ (4) १३५

**6.**



(1) (2) (3) (4)

**प्र. 7 ते 9 : सूचना - मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी येणारे पद ओळखा .**

**7.** ७३, ७१, ६७, ६१, ?
(1) ७ (2) ५९ (3) ५५ (4) ५२

**8.** ⊠○○○⊠, ○○○⊠⊠ , ○○⊠⊠○, **?**

(1) ○○○⊠⊠ (2)○○⊠⊠○ (3)○⊠⊠○○ (4)⊠⊠○○○

**9.**





(1) (2) (3) (4)

**10.** खालील संख्यामालिकेतील चुकीचे पद ओळखा .

१, ५, १३, ३०, ६१,

(1) ५ (2) ३० (3) १ (4) ६१

**11.** वाघाला शेळी म्हटले, शेळीला हत्ती म्हटले, हत्तीला कासव म्हटले तर सर्वात मोठा प्राणी कोणता असेल ?

(1) हत्ती (2) शेळी (3) कासव (4) वाघ

**12.** सागर सरीता पेक्षा हुशार आहे. सरीता सुरेशपेक्षा हुशार आहे व सुरेश सुरजपेक्षा हुशार आहे तर सर्वांत हुशार कोण?

(1) सरीता (2) सागर (3) सुरेश (4) सुरज

**13.** सोबतच्या आकृतीत एकूण त्रिकोण किती आहेत?

(1) २ (2) ४ (3) ८ (4) ६



**14.** सोबतच्या आकृतीत एकूण अर्धवर्तुळांची संख्या किती?

(1) २ (2) ४ (3) ३ (4) ६



**प्र. 15 व 16 : सूचना - प्रश्न आकृतीचे जलप्रतिबिंब पर्यायातून निवडा**

**15.** (प्रश्न आकृती )



(पर्याय आकृत्या)



(1) (2) (3) (4)

**16.** (प्रश्न आकृती)



(पर्याय आकृत्या)



(1) (2) (3) (4)

**प्र.17 व 18 : सूचना - प्रश्न आकृतीची आरशातील प्रतिमा पर्यायांतून निवडा.**

(प्रश्न आकृती) (पर्याय आकृत्या)

**17.**





(1) (2) (3) (4)

**18.**





(1) (2) (3) (4)

**प्र. 19 ते 21 : सूचना - पहिल्या व दुसऱ्या पदामध्ये जो संबंध आहे. तसाच संबंध तिसऱ्या व चौथ्या पदामध्ये आहे. तर प्रश्न चिन्हाच्या जागी असणारे पद ओळखा.**

**19.** ऊस : गोड आवळा : ?

(1) तुरट (2) खारट (3) कडू (4) तिखट

**20.**





(1) (2) (3) (4)

**21.** १४ : ४२ १७ : ?

(1) १०२ (2) ६१ (3) ६८ (4) ८५

**22.** डावीकडील प्रश्न आकृतीशी तंतोतंत जुळणारी आकृती खालील पर्यायांपैकी कोणती?

(प्रश्न आकृती) (पर्याय आकृत्या)



(1) (2) (3) (4)

**23.** सरळ रांगेत उभा असलेल्या सिद्धेशचा समोरुन ५वा क्रमांक असून त्याच्या लगत पाठीमागे उभा असलेल्या तेजसच्या पाठीमागे १७ मुले उभी आहेत तर रांगेत एकूण किती मुले आहेत?

(1) २२ (2) २३ (3) २४ (4) २१

**24.** रुपेश उगवत्या सूर्याकडे तोंड करुन उभा आहे. तो त्याच्या उजव्या बाजूने काटकोनात तीनदा वळला तर त्याच्या उजव्या हाताची दिशा कोणती येईल?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) दक्षिण (4) उत्तर

**25.** शुक्रवारी २८ फेब्रुवारी २०१४ रोजी जन्मलेल्या वेदांतचा 3रा वाढदिवस कोणत्या वारी येईल?
(1) शुक्रवार (2) रविवार (3) मंगळवार (4) बुधवार

**26.** खालील आकृतीत फक्त वर्तुळातील संख्या कोणती?




(1) ७ (2) ४ (3) ६ (4) १२

**27.** सोबतच्या चौकोनात प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?
(1) २७ (2) ३५ (3) ४२ (4) १०

| | | |
|---|---|---|
| २ | ८२ | १७ |
| ६५ | ५० | ? |
| ३७ | ५ | २६ |

**प्र.28 ते 30 : सूचना - गटाशी जुळणारे पद ओळखा.**

**28.** कबड्डी, खोखो, क्रिकेट
(1) बुद्धिबळ (2) कॅरम (3) फुटबॉल (4) कुस्ती

**29.** २, ७, ११, १३
(1) १५ (2) १६ (3) १७ (4) १८

**30.**






(1) (2) (3) (4)

**31.** एका सांकेतिक भाषेत 'महानायक' हा शब्द २५७३८, 'पानिपत' हा शब्द १६९४ असा लिहिला जातो तर त्या भाषेत 'निहाय' हा शब्द कसा लिहाल?

(1) ५६३ (2) ३५६ (3) ६५३ (4) ८५३

**प्र. 32 व 33 : सूचना - एका भाषेतील काही खुणा दिल्या आहेत. त्यांचे निरीक्षण करुन याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

| स | व | क | श | काना | वेलांटी |
|---|---|---|---|---|---|
| □ | △ | ○ | × | π | ⊗ |

**32.** 'सावकाश' हा शब्द खालील पर्यायांपैकी कसा लिहिता येईल?

(1) □△π○π× (2) □π△○π× (3) □π○△π× (4) π□○△π×

**33.** ○π□π△⊗□ या चिन्हांनी कोणता शब्द दाखविला जाईल?

(1) कावीसास (2) कासासवी (3) काससवी (4) कासावीस

**34.** 'शाळेतील विद्यार्थी पाय घसरुन पडला' असता सर्वप्रथम तुम्ही काय कराल?

(1) त्याच्याकडे पाहून मोठयाने हसू.

(2) पटकन जाऊन त्याला उचलू.

(3) डॉक्टरांना शोधायला जाऊ.

(4) मित्राला त्याला उचलायला सांगू.

**35.** 'रस्त्याने जात असताना अंध व्यक्तीला रस्ता ओलांडता येत नाही, अशा वेळी तुम्ही काय कराल?'

(1) त्याच्याकडे दुर्लक्ष करु.

(2) त्याचे आम्ही सर्वजण निरीक्षण करु.

(3) त्याला चुकीच्या दिशेने नेऊ.

(4) त्याला रस्ता ओलांडण्यासाठी मदत करु.

## विभाग II

## परिसर अभ्यास भाग - 2 गुण - 30

**36.** शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील वतनदारांचे लक्ष प्रामुख्याने कशावर होते?

(1) रयतेच्या सुखावर (2) प्रजेच्या संरक्षणावर

(3) वतनावर (4) स्वराज्य निर्मितीवर

**37.** सामर्थ्याचे महत्त्व लोकांना कोणी पटवून दिले?

(1) संत तुकाराम (2) संत नामदेव (3) संत एकनाथ (4) समर्थ रामदास

**38.** शके १५५१ मधील --------- वद्य तृतीयेला शिवाजी महाराजांचा जन्म झाला.

(1) फेब्रुवारी (2) वैशाख (3) फाल्गुन (4) चैत्र

**39.** शिवराय बालपणी कर्नाटकात असताना कोंढाणा किल्ल्याचे सुभेदार कोण होते?

(1) दादाजी कोंडदेव (2) तानाजी मालुसरे (3) उदेभान (4) चंद्रराव मोरे

**40.** 'बंड केलिया मारले जाल' हे उद्‌गार कोणाचे?

(1) चंद्रराव मोरे (2) आदिलशाहा (3) यशवंतराव मोरे (4) शिवाजी महाराज

**41.** शिवाजीचा बंदोबस्त करण्याचा विडा उचलणारा अफजलखान पूर्वी कोणत्या ठिकाणचा बारा वर्षे सुभेदार होता?

(1) जावळी (2) वाई (3) प्रतापगड (4) पुणे

**42.** पन्हाळयाच्या वेढ्याच्या वेळी सिद्दी जौहरच्या छावणीत जल्लोष सुरु झाला कारण_ _ _ _ _ .

(1) सिद्दी जौहरचा वाढदिवस होता.

(2) शिवाजी महाराज सापडले म्हणून.

(3) कंटाळलेल्या सैनिकांना मनोरंजन करायचे होते.

(4) बाजीप्रभू तावडीत सापडला होता.

**43.** लाल महालात तळ ठोकून बसलेल्या शाहिस्ताखानावर शिवाजी महाराजांनी ------------ च्या रात्री हल्ला केला.

(1) ५ एप्रिल १६६३ (2) १५ एप्रिल १६६३

(3) ५ फेब्रुवारी १६६३ (4) १५ एप्रिल १६५३

**44.** मुरारबाजीने कोणत्या किल्ल्यावर अतुल पराक्रम गाजवला?

(1) कोंढाणा (2) पन्हाळा (3) पुरंदर (4) शिवनेरी

**45.** लढाई/युद्धप्रसंगांशी संबंधीत चुकीची जोडी ओळखा.

(1) तानाजी मालुसरे - उदेभान (2) बाजीप्रभू देशपांडे - सिद्दी मसूद

(3) शिवराय - अफजलखान (4) मुरारबाजी - मिर्झाराजे जयसिंग

**46.** शिवरायांचा राज्याभिषेक करणाऱ्या गागा भट्टांचे घराणे मूळ ----- येथील होते.

(1) काशी (2) पैठण (3) मथुरा (4) द्वारका

**47.** शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळात धर्माची कामे पाहण्याचे काम कोण करत असे?

(1) पंडितराव (2) अमात्य (3) सुमंत (4) सचिव

**48.** शिवाजी महाराजांनी 'परक्या शत्रूंचा भरवसा धरु नये, पुरुषार्थ गाजवावा' असे कोणास सांगितले?

(1) संभाजी राजांस (2) जयसिंगास (3) व्यंकोजीराजांस (4) चंद्ररावांस

**49.** खालील पर्यायांपैकी गटात न बसणारे पद ओळखा.

(1) सिंधुदुर्ग (2) कोंढाणा (3) प्रतापगड (4) राजगड

**50.** प्रतिशिवाजी म्हणून कोणाला ओळखले जात असे?

(1) प्रतापराव गुजर (2) हंबीरराव मोहिते (3) नेतोजी पालकर (4) व्यंकोजीराजे

# पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (MSS)

## उत्तरसूची

### प्रश्नपत्रिका क्र : III

### विषय : बुद्धिमत्ता चाचणी व परिसर अभ्यास भाग - 2

| प्रश्न क्र. | उत्तराचा पर्याय क्र. | प्रश्न क्र. | उत्तराचा पर्याय क्र. |
|---|---|---|---|
| 1. | 1 | 26. | 4 |
| 2. | 4 | 27. | 4 |
| 3. | 4 | 28. | 3 |
| 4. | 1 | 29. | 3 |
| 5. | 2 | 30. | 3 |
| 6. | 3 | 31. | 3 |
| 7. | 2 | 32. | 2 |
| 8. | 3 | 33. | 4 |
| 9. | 2 | 34. | 2 |
| 10. | 2 | 35. | 4 |
| 11. | 3 | 36. | 3 |
| 12. | 2 | 37. | 4 |
| 13. | 4 | 38. | 3 |
| 14. | 2 | 39. | 1 |
| 15. | 3 | 40. | 4 |
| 16. | 3 | 41. | 2 |
| 17. | 4 | 42. | 2 |
| 18. | 3 | 43. | 1 |
| 19. | 1 | 44. | 3 |
| 20. | 3 | 45. | 4 |
| 21. | 1 | 46. | 2 |
| 22. | 4 | 47. | 1 |
| 23. | 2 | 48. | 3 |
| 24. | 1 | 49. | 1 |
| 25. | 3 | 50. | 3 |